# मनोभावे गुरूला स्मरू, निशिदिन पूजा गुरूची करू

(चाल : आनंदी आनंद रे )

मनोभावे गुरूला स्मरू,
निशिदिन पूजा गुरूची करू ||धृ ||

गुरू ज्ञानाचा सागर आहे,
सद्‌भक्तीचे आगर आहे
गुरू शक्तीचा  डोंगरू ||१||

करी जो सेवा, सदा संतांची,
पूजा खरी ही भगवंताची
संतसेवेने झोळी भरू ||२||

प्रेम, नम्रता, दया करूणा,
अंगिकारू या दिव्य गुणांना
सद्‌गुणांना नित्य आचरू  ||३||

गुरूभक्तीत सुख मानूनी,
भक्ती करूया मनापासूनी
गुरूभक्तीची कास धरू ||४||

‘अनिकेत’ या ज्ञानकर्माने,
जीवन सजवू गुरूवचनाने
जीवनाला या उद्धारू||५||